दैनिक

# सेवाशक्ती टाईम्स

https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

बुलडाणा ● वर्ष:- 3 रे ● अंक:- ९३ ● पाने:- ४ ● किंमत:- २ रुपये ● RNI:- MAHMAR/2022/87884 ● रविवार २५ मार्च २०२५


## महाराष्ट्र 2047 व्हिजन ते गुंतवणूक, बैठकीतील फडणवीसांच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा



**मुंबई :** नुकतीच नीती आयोगाची महत्त्वाची बैठक पार पडली, या बैठकीमध्ये भाषण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात सध्या सुरू असलेल्या विविध योजनां बाबत आणि भविष्यात राबवण्यात येणाऱ्या योजनां संदर्भात माहिती दिली. आता दीडशे दिवसांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यात 2047 साठी दीर्घकालीन, महाराष्ट्र आपला अमृत महोत्सव साजरा करेल, त्या कालावधीचे म्हणजे 2035 साठी आणि प्रतिवर्षाच्या उद्दिष्टांसह 2029 साठीचे अल्पकालिक 5 वर्षांचे असे व्हीजन तयार करण्यात येत आहे. विद्यमान अर्थव्यवस्था 2030 पर्यंत 1 ट्रिलियन डॉलर्स आणि 2047 पर्यंत 5 ट्रिलियन डॉलर्सची करणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे. नवीन उद्योग धोरणाचा उद्देश जीडीपीत उत्पादन क्षेत्राचे योगदान 20 टक्क्यांच्या वर आणणे हा आहे. मैत्री 2.0 ही सिंगल विंडो क्लि अरन्स प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून, ईव्ही, सेमिकंडक्टर, ग्रीन हायड्रोजन, डेटा सेंटर्स यासारख्या नव क्षेत्रांना प्रोत्साहित करण्यात येत आहे. 2024-25 या पहिल्या तिमाहीत देशात सर्वाधिक 1.39 लाख कोटींची परकीय गुंतवणूक आकर्षित केली आहे. दावोस वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम मध्ये 15.96 लाख कोटींचे सामंजस्य करार केले. त्यातील 50 टक्के प्रस्तावांवर प्रक्रिया सुरु झाली असून, त्यातील अधिकाधिक गुंतवणूक ही दुसऱ्या आणि तिसऱ्या श्रेणीतील शहरांमध्ये होत आहे. विकासाला गती देण्यासाठी पायाभूत सुविधा, विविध सुधारणा आणि रोजगार वाढविण्यावर आमचा भर आहे. समृद्धी महामार्ग, अटलसेतू, कोस्टर रोड आदी प्रकल्प महा राष्ट्राच्या विकासाला आणि पायाभूत क्षेत्रातील क्रांतीला गती देत आहेत. वाढवण पोर्ट, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो, रेल्वे, मल्टीमॉडेल लॉजिस्टिक पार्क हे क्षेत्रीय विकासाला चालना देणार असून, त्यासाठी आम्ही पंतप्रधान महोदयांचे आभारी आहोत, असं यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी म्हटलं. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी देशाचे नवे सरन्यायाधीश भूषण गवई यांची देखील भेट घेतली. त्यांना विधानमंडळात सर्वपक्षीय सत्कार तसेच, भारतीय संविधान याविषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानासाठी वेळ देण्याची विनंती यावेळी मुख्यमंत्र्यांनी केली.

### फडणवीस यांच्या भाषणातील ठळक मुद्दे !

**भारतीय सैन्य दल आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे 'ऑपरेशन सिंदूर' बद्दल हृदयपूर्वक आभार आणि अभिनंदन. मोदीजींच्या दहशतवादाविरोधात झिरो टॉलरन्सचा संकल्प यातून अधोरेखित होतो.राष्ट्रीय धोरणानुसार, महाराष्ट्र सरकार सुद्धा महाराष्ट्र 2047 असे व्हीजन तीन टप्प्यात तयार करीत आहे. 100 दिवसांच्या सुशासन, नागरिक केंद्रीत उपाययोजना आणि उत्तरदायित्त्व अशा सूत्रावर एक कार्यक्रम आमच्या सरकारने हाती घेतला. यात विविध विभागांनी 700 हून अधिक उद्दिष्ट साध्य केले.विद्यमान अर्थव्यवस्था 2030 पर्यंत 1 ट्रिलियन डॉलर्स आणि 2047 पर्यंत 5 ट्रिलियन डॉलर्सची करणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे. नवीन उद्योग धोरणाचा उद्देश जीडीपीत उत्पादन क्षेत्राचे योगदान 20 टक्क्यांच्या वर आणणे हा**

## ठाण्यात कोरोनाचा पहिला बळी, 21 वर्षीय तरुणाचा मृत्यू
## मुंबई, पुणे, ठाणे यासारख्या शहरांत रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा




**ठाणे :** गेल्या काही दिवसां पासून राज्यात कोरोना ग्रस्तांची संख्या वाढत आहे. मुंबई, पुणे, ठाणे यासारख्या शहरांत रुग्णांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. असे असतानाच आता ठाणे जिल्ह्यातून मोठी माहिती समोर येत आहे. येथे अवघ्या 21 वर्षीय तरुणाचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. या मृत्यूनंतर आता सर्वांनी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले जात आहे.

**ठाण्यात 21 वर्षीय तरुणासोबत नेमकं काय घडलं?**

मिळालेल्या माहितीनुसा ठाण्यात 21 वर्षीय तरुण कोरोनाचा पहिला बळी ठरला आहे. ठाण्यातील कळवा छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात 21 वर्षीय तरुणावर गेल्या काही दिवसांपासून कोरोनावर उपचार चालू होते. मात्र उपचारादरम्यान त्याने याच रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. हा तरुण मुंब्रा येथील रहिवासी आहे. सकळी 6 वाजेच्या सुमारास त्याच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. त्याला 22 मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार चालू असताना त्याची कोरोना चाचणी करण्यात आली होती. या चाचणीचा अहवाल काल समोर आला होता. त्याची ही कोरोना चाचणी पॉझिटिव्ह आली होती. त्यानंतर त्याचा आज सकाळी 6 वाजता उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

**मुंबईत कोरोनाची स्थिती काय?**


मुंबईत सध्या कोरोना झपा ट्याने वाढत आहे. 23 मे रोजी राज्यात 45 नवे कोरोनाग्रस्त आढळले. यात एकट्या मुंबईत सापडलेल्या कोरोना ग्रस्तांची संख्या ही 35 आहे. सध्या मुंबईतीली कोरोना ग्रस्तांची संख्या ही 185 पर्यंत पोहोचली आहे. आज याच रुग्ण संख्येत काही भर पडण्याची शक्यता आहे. मे महिन्या पासून मुंबईत कोरोनाग्रस्तांची संख्या वाढत आहे. त्यामुळे योग्य ती काळजी घ्या, असे आवाहन मुंबई महानगरपालिकेकडून केले जात आहे.

**प्रशासनाकडून काय आवाहन केलं जातंय?**

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्र तसेच देशाच्या इतर भागात कोरोनाचा संसर्ग वाढला आहे. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी मास्क वापरण्याचा सल्ला दिला जातोय. तसेच कोरोना संसर्गाची लक्षणं आढळल्यास त्वरित चाचणी करून घ्यावी, असे सांगितले जात आहे. सोबतच कोरोनाचा संसर्ग होऊ नये यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन केले जात आहे.

## केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आदेशावरून थेट पुण्यात मोठी कारवाई, कॉल सेंटरमध्ये काय सुरू होतं?; पुण्यात खळबळ

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा




**पुणे :** केंद्र सरकारने चुकीच्या गोष्टींना आळा घालण्यासाठी कठोर पावलं उचलली आहेत. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर तर केंद्र सरकारने अशा चुकीच्या घडामोडींवर अधिक लक्ष केंद्रीत केलं आहे. आज पुणे येथील खराडी परिसरात तर पोलिसांनी एक कॉल सेंटरवर छापा मारला. विशेष म्हणजे केंद्रीय गृहमंत्रालयाच्या आदेशानंतर ही कारवाई करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे. या कॉल सेंटरमध्ये असे काय चालत होतं की ज्यासाठी केंद्राला दखल घ्यावी लागली? असा सवाल या निमित्ताने केला जात आहे. आंतरराष्ट्रीय पातळी वरूनच केंद्रीय गृह मंत्रालयाला या सेंटरची तक्रार आली होती. त्यामुळे केंद्रीय गृहमंत्रालयाने पुणे पोलिसांना या सेंटरवर कारवाई करण्याचे आदेश देताच पुणे पोलिसांनी धाड धाड छापे मारत 123 जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. पुण्यातील ही सर्वात मोठी कारवाई असल्याचं सांगितलं जात आहे.

**केंद्रकडे तक्रार येताच...!**

केंद्रीय गृहमंत्रालयाने पुणे पोलिसांना या कॉल सेंटरची माहिती देऊन कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पुणे सायबर पोलीस, गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांनी मिळून ही मोठी कारवाई केली. बनावट कॉल सेंटर प्रकरणी पाच आरोपींना अटक करण्यात आलीय आहे. तर 2 जण फरार आहेत. या कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या 123 पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांची कसून चौकशी सुरू आहे. बनावट कॉल सेंटरमध्ये जे मोबाईल, लॅपटॉप ब्लॅकमेलिंग साठी आणि फसवणूक करण्यासाठी वापरले जायचे ते पोलिसांनी जप्त केले आहेत. एकूण 41 मोबाईल आणि 62 लॅपटॉप पोलिसांकडून जप्त करण्यात आले आहेत.

**डीजिटल अरेस्टचा खेळ!**

या बनावट कॉल सेंटर प्रकरणी अटक करण्यात आलेले आरोपी गुजरातचे असल्याची माहिती आहे. महाराष्ट्रातील काही लोकही यामध्ये सहभागी असल्याचे समजतंय. परदेशातील नागरिकांना या प्रकरणात टार्गेट केलं जायचं आणि डिजिटल अरेस्टची भीती दाखवून फसवणूक केली जायची, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. परदेशातील नागरिकांना डीजिटल अरेस्ट करण्या साठीच हे बोगस कॉल सेंटर उघडण्यात आलं होतं, असं सूत्रांनी सांगितलं.

**तीन महिन्यापासून काम सुरू!**

या संपूर्ण प्रकरणात करण शेखावत हा मुख्य आरोपी आहेत. त्याच्या या कॉल सेंटरमध्ये 123 लोक काम करत होते. गेल्या तीन महिन्यांपासून या ठिकाणी काम सुरू होते, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली. या प्रकरणी पोलीस आता गुन्हा दाखल करत आहेत. आरोपींची कसून चौकशी करण्यात येणार आहे. या लोकांचे कॉल सेंटर आणखी किती ठिकाणी होते? त्यांनी कुणा कुणाला शिकार बनवलं होतं? तसेच या आरोपींचे कुणाशी लागेबांधे आहेत का? याचाही तपास केला जाणार असल्याचं सांगितलं जात आहे.

## मुंबई महापालिका निवडणुकीवरून संजय राऊत यांचं मोठं विधान, थेट सरकारला आव्हान !

सेवाशक्ती टाईम्स वृत्तसेवा




**मुंबई :** गेल्या वर्षी नोव्हेंबर मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर मदतानावरून महा विकास आघाडीने महायुतीवर टीका केली होती. आता मंबई महापालिका निवडणुकांचे पडघम वाजू लागले असून सर्वच पक्ष त्याची कसून तयारी सुरु केली आहे. मात्र त्याच पार्श्वभूमीवर बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे खासदार, नेते संजय राऊत यांनी एक मोठं विधान करत सरकारला मोठं आव्हान केलं आहे. विधानसभा ज्या पद्धतीने तुम्ही जिंकला, त्यावरून तुमची आंतरराष्ट्रीय स्तरावर छी थू झाली. कशा पद्धतीने महाराष्ट्राच्या निवड णुका हायजॅक केल्या, जिंकल्या ते दिसलं. पण महापालिकेत तुम्ही तेच करू इच्छित आहात. पण मुंबईतला समस्त मुंबईकर आणि मराठी माणूस तुमचे मनसुबे पूर्ण होऊ देणार नाही असे राऊत यांनी बजावलं. मुंबईची निवडणूक तरी बॅलेटपेपरवर घेऊन दाखवा, असं आव्हान राऊतांनी सरकारला दिलं.

**मराठी माणूस तुमचे मनसुबे पूर्ण होऊ देणार नाही!**

मुंबईचं चित्र वेगळं आहे. विधानसभा ज्या पद्धतीने तुम्ही जिंकला, त्यावरून तुमची आंतरराष्ट्रीय स्तरावर छी थू झाली आहे. कशा पद्धतीने महाराष्ट्राच्या निवडणुका हायजॅक केल्या, जिंकल्या, बनावट आणि बोगस नावं टाकून ६२ ते ७० लाख मते एका तासात वाढवली. हे काही लोकशाही सदृढ असल्याचं लक्षण नाही. पण महापालिकेत तुम्ही तेच करू इच्छित आहात. पण मुंबईतला समस्त मुंबईकर आणि मराठी माणूस तुमचे मनसुबे पूर्ण होऊ देणार नाही, असा इशारा राहुतांनी दिला. धमक्या काय देता?मला जर मतं दिली तर निधी देईल, हे बोलणं कोणत्या संविधानात बसतं ? असा थेट सवाल राऊतांनी विचारला. तुम्ही संविधान विरोधी आहात, कायदे विरोधी आहात असं आम्ही म्हणतो ते याचसाठी. मला मत दिलं तर तुमचा विकास करू. ते शहराचा, राज्याचा, देशाचा विकास करायला बांधिल नाहीत. जे त्यांच्यासोबत नाहीत त्यांना दारिद्र्यात आणि अविकसित ठेवणार आहेत, अशी टीका राऊतांनी केली. हे यांचं वेगळं संविधान, मनुवाद आहे. मनुस्मृतीचं संविधान यांचं बनलं आहे. ठिक आहे. त्यांना करू द्या. काही हरकत नाही, असंही राऊत म्हणाले.

### काय म्हणाले संजय राऊत ?

**मुख्यमंत्र्यांची ही धमकी आहे. अशा प्रकारच्या धमक्या त्यांनी लोकसभा, विधानसभा आणि महापालिकेला दिल्या. आता ग्रामपंचायत, जिल्हा परिषदेतही अशा धमक्या देतील. हे धमक्या देऊनच निवडणूक जिंकत आहेत ना. निधी, धमक्या, खंडण्या... त्यानंतर कायद्याचा गैरवापर. मुंबई त्यांना जिंकायची आहे. ते कशा पद्धतीने निवडणूक जिंकतात, ही ईस्ट इंडिया कंपनीचे पार्टनर आहेत. एक्स्टेंडेड ब्रँच ऑफ ईस्ट इंडिया कंपनी. यांचं हेड क्वॉर्टर सुरतला आहे. आता मुंबई जिंकायची आणि अमित शाह यांच्या, व्यापाऱ्यांच्या पायाशी टाकायची हे यांचं धोरण आहे. जसं पोर्तुगीजांकडून ब्रिटीशांनी मुंबई घेतली. मग याला भेट दिली. त्याला नजराना दिला. तसं फडणवीस यांना मुंबईचा नजराना ईस्ट इंडिया कंपनी प्रायव्हेट लिमिटेड सुरत यांना द्यायचा आहे. किंवा अहमदाबादला द्यायचा. त्यासाठी धमक्या, दहशत आणि आर्थिक उलाढाली सुरू आहेत अशी टीका राऊतांनी केली.**

## अग्रलेख

### - मुसळधार पाऊस...! -

शाळेला उन्हाळ्याची सुट्टी चालू होती. मे महिना संपत आला होता.आयुष, अजिंक्य आणि विराज तिघे जिवलग मित्र. खंडाळी गावात असणाऱ्या त्यांच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत ऊन उतरल्यावर खेळायला आली होती. शाळेच्या गेटवर चढून तिघेजण आत आली शिवणापाणी चा खेळ चालू झाला. खेळ रंगात आला होता तेवढ्यात आकाशात लख्ख वीज चमकली व अचानक आकाशात काळे ढग जमू लागले. ढगांच्या गडगडाटाकडे दुर्लक्ष करत मुलांनी त्यांचा खेळ चालूच ठेवला. विजा चमकत होत्या,आकाशातील काळ्या ढगांमुळे वातावरण आल्हाददायक झाले होते. अचानक वादळ वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. मुले रिमझिम पावसाचा आनंद घेत खेळतच होती पण रिमझिम पावसाने रुद्र रूप कधी धारण केले हे मुलांना कळालेच नाही. मुसळधार कोसळणाऱ्या पावसामुळे मुले शाळेच्या व्हरांड्यात आडोशाला उभी राहिली. पाऊस थांबण्याची वाट बघू लागली तेवढ्यात धाड धाड असा जोराचा आवाज झाला. अतिशय जुन्या असणाऱ्या शाळेच्या एका वर्ग खोलीचे छत कोसळले होते. वर्गाची अवस्था फारच वाईट झाली होती. तिघेही मित्र हताशपणे वर्गाकडे बघत असतानाच अजिंक्य म्हणाला, “ मित्रांनो, आपण काहीतरी केले पाहिजे. वर्गातील सर्व साहित्य भिजत आहे, शाळेचे व वर्गाचे नुकसान होत आहे. आपण ही घटना शिक्षकांना कळवूयात.” तेव्हा तिघेही जवळच घर असणाऱ्य आयुष च्या वडिलांकडे गेले व शिक्षकांना फोन करून शाळेतील घडलेली घटना कळवण्यास सांगितले. मुसळधार पाऊस चालू असल्यामुळे फोनला रेंज येत नव्हती, कोणाचे ही फोन लागत नव्हते. मुले काळजीत होती. पाऊस वाढतच चालला होता. शाळेच्या होणाऱ्या नुकसानीमुळ मुलांना स्वस्थ बसवेना. विराज म्हणाला, “ रात्रभर पावसात सर्व साहित्य भिजून जाईल, शिक्षकांचे महत्वाचे कागदपत्र असतील, आता काय करायचे? चला आपणच काहीतरी करूया.” तिघेही मोठ्या माणसांची मदत मिळते का बघू लागले, पण मोठ्या माणसांची मदत मिळेना म्हणून तिघेही नाराज झाले. त्यानंतर धीर न सोडता यातून कसा मार्ग काढता येईल याचा ते विचार करू लागले. हळूहळू वातावरण बदलू लागले,पावसाचा जोर कमी झाला. पावसाची हलकी भुरभुर चालू होती तेव्हा तिघे परत शाळेत आली. छत पडलेल्या वर्गातील सर्व कागदपत्रे काळजीने बाहेर काढून जवळ असलेल्या आयुषच्या घरी नेऊन पंखा लावून वाळवायला ठेवले. परत जाऊन अजून कोण कोणते साहित्य हळूहळू बाहेर काढता येईल ते बघून काढू लागले. त्यांची ही धडपड बघून आजूबाजूचे अजून काही लोक त्यांच्या मदतीला आले.वर्गातले बरेचसे शैक्षणिक साहित्य बाहेर काढून शेजाऱ्यांच्या घरी नेऊन ठेवले. आता जास्त काही शैक्षणिक नुकसान होणार नाही हे समजल्यावर तिघांनीही आनंदाने घर गाठले. दुसऱ्या दिवशी ही बातमी गावात व शिक्षकांना समजल्यावर शाळेच्या सुरक्षेसाठी धडपडणाऱ्या तिघा मित्रांचे सर्वत्र कौतुक होऊ लागले. सर्वजण शाळेजवळ जमल्यावर तिघांनाही बोलवण्यात आले. तेव्हा शाळेकडे बघून तिघांच्याही चेहऱ्यावर आनंदाची फुले डोलत होती. कागदपत्रांचे व शैक्षणिक साहित्याचे कसलेही नुकसान झाले नाही असे शिक्षकांनी सर्वांना सांगितले व मुलांना बक्षीस व खाऊ देऊन त्यांच्या धाडसाचे कौतुक करण्यात आले. पावसात नाहून निघालेली शाळा सकाळच्या कोवळ्या उन्हात आनंदाने मस्त टवटवीत झाली होती. काल केलेल्या मदतीबद्दल जणू काही शाळा त्या तिघा जिवलग मित्रांना ‘धन्यवाद’ म्हणत होती.

## - प्रेमाची जादू -




प्रेमाची जादू जगात असते .त्या जादू ने आपण भारून जातो. काही काळ खूप खुश होतो. त्या जादूने आपले सगळे प्रश्न संपतील, जादूची कांडी फिरवल्यासारखं आपल्याला आरोग्य मिळेल ,अशी नवीन आयुष्याची स्वप्न आपण त्या जादूच्या प्रभावाखाली बघू लागतो .काही काळ त्या प्रेम परिमाणांनी परिणामांनी आपण भारीत होतो.उदाहरणार्थ तत्कालीन जादूचे काही मुद्देखालील प्रमाणे आहेत. मैत्री मैत्री आयुष्यभर टिकते. पण मैत्रीची जादू सुरुवातीला काही काळ भारून टाकते .त्याला मधुचंद्राचे दिवस म्हणतात. तसं नवीन मैत्री झाली, ओळख झाली की आपण काही काळ खूप भारून जातो .आपल्याला करणी झाली असं होतं .त्या व्यक्तीशी बोललो वागण्यास आतुरतो.ती नं भेटल्या कारणाने जादूने आपणास अस्वस्थ होतो .पण नंतर नंतर त्या मैत्रीतले टोकेरी कंगोरे टोचायला लागतात .प्रेमात गुडी गुडी दिवस संपले की मग आपल्याला ती जादू ओसरल्यासारखी वाटते. नवीन नट्या मॉडेलनवीन नट नट्या बाजारात आल्या, सिनेमात दिसू लागल्या की आपण खुश होतो. काही दिवस त्यांची चर्चा ,त्यांचे सिनेमा ,त्यांचेच कौतुक ,त्यांचेच फोटो असतात.पण हळूहळू यथावकाश त्यांची ती जादू ओसरुन जाते .मग ते नट वयस्कर दिसायला लागतात. त्याचा कंटाळा यायला लागतो. म्हणजे ती वरची जादू सुद्धा चिरकाल टिकत नाही .मोहिनी घातली मोहिनी घातली असं म्हटलं तरी ती मोहिनी पण अल्पकाळात टिकत असते .पुस्तक काही पुस्तकांची फॅशनच येते. मग त्या पुस्तकांवर लोक खूप चर्चा करतात .त्या पुस्तकांनी भारून जातात. मग लवकरच ती पुस्तक जादू संपते .दुसरे कुठलं तरी पुस्तक बाजारात येत आणि हे अडगळीत पडतं. सिनेमा सिनेमा पण एखादा खूप गाजतो. 500 कोटी क्लब मध्ये जातो. याच, एक्टिंग ,हे बक्षीस ते बक्षीस ,त्यातली गाणी सगळीकडे वाजतात. नंतर ती जादू ओसरली की ती गाणी सुद्धा अनोळखी वाटू लागतात .गोष्ट भंपक वाटु लागते.निसर्ग एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी गेल्यावर सुरुवातीला आपण एक-दोन दिवस इतके भारून जातो,असे वाटते इथेच झोपडी घालून इथेच राहावं.हेच स्वप्न पूर्तीचे क्षण आहेत. व तिसऱ्या दिवशी त्याचे नकारात्मक बिजूचे परिणाम दिसू लागतात .कारण तेव्हा जादू ओसरलेली असते. किडे,डास,अंग खाजवायला लागतं.निसर्गाचा तोच तो पणा जाणवायला लागतो आणि मग ती आभा जादू ओसरेल .राजकारण राजकारण्यांमध्ये सुद्धा एखादा राजकारणी आला की त्याची खूप मोहिनी असते. त्याच्याबद्दल छापून येते.सक्सेस शाईनिंग , अस म्हणून त्याच्याबद्दल सगळीकडे कौतुकाची जादू दिसते. काही काळाने ,ईमेज फिकी होते .तिची /त्याची जादू देखील ओसरते.बिल्डर एखाद्या बिल्डर चे नाव होतं .त्या बिल्डरची जादू, त्याचा करिष्मा ,सगळीकडे त्याचे पोस्टर लागतात.त्याचीच कौतुक ,त्याचीच उदो उदो चालू राहते .मग लवकरच ती लोकप्रियतेची जादू जाते .प्रेम प्रेम म्हणजे प्रेम असते. किताबो मे छपते है चाहत के किस्से ,हकीकत की दुनिया मे चाहत नही है असं म्हणतात. तसं मग ते प्रेमाचा डीपफेक ईफेक्ट समजतो. चकव्या मधून माणूस बाहेर पडतो. ती जादू सरून जाते .नजरजादू तेरी नजर ,तेरे नैनो ने जादू किया ,असं म्हणणारे डोळ्यात मोतीबिंदू झाल्यावर आपल्याला ते नकोसे वाटायला लागतात. कारण की ती जादू अल्पजीवी असते .मूल होणे मुलं झाली की आई-वडिलांचे जीवन कृतार्थ होतं. पुढे ती पोरं त्रास द्यायला लागतात, शाळेत जायला लागतात. त्यांचे प्रश्न निर्माण होतात पहिल्या एवढे ते आपल्याला अँटच राहत नाही. त्यांच्या जीवनात अन्य कोणी येतं आणि मग आपली त्यांच्यावरची जादू आणि त्यांचे आपल्यावरची जादू संपून जाते .अगदी बरोबर.कोणत्याही गोष्टीची, वस्तूंची,विचारांची.... अगदी कोणतीही जादू काही काळानंतर ओसरते आणि गाडी मूळ पदावर येते .देवाची जादू अविरत असते.अस स्तुत्य विश्लेषण केले ,तरी ती वेळ यावी लागते..आईआईचं प्रेम ही देखील एक जादूच असते .बालपणी आईसाठी वेडा होणाऱ्या मुलांना पुढे , आई गावठी वाटते.आईचं वय झाल्यावर आणि मुलं तारुण्यात आल्यावर ,आई-वडील नकोशी होतात. आपण कथा ऐकतोच की प्रेयसी साठी आईच हृदय मुलगा घेऊन जात असतो आणि जाताना हे ठेचकळून पडल्यावर त्या हृदयातून आवाज येतो ,"बाळ तुला लागलं नाही ना!" आईचे प्रेम असं असतं. पण त्या माऊली प्रेमाची मोहिनी दीर्घकाळ टिकत नाही. ही जगरहाटी ही जग रहाटी आहे .कुठलीही गोष्ट चिरंतन नसते आणि प्रेम दीर्घकाळ टिकत नसते. प्रेमात बदल होत जातो .प्रेमाची जादू सरत राहते. सूर्यप्रकाश सूर्यप्रकाश ही सुद्धा जादू असते. इतकं छान वाटतं. असं वाटतं आपण ताजेतवाने झालो .आपला अनु रेणू बदलून गेला आणि कोवळ्या सूर्यप्रकाशाचा आनंद आपण घेतो .पण मध्यान्हानंतर सूर्य तापू लागला की आपल्याला कंटाळा येतो. आपल्या डोळ्याला त्रास होतो.रात्रिची वाट बघू लागतो,कारण की जादू संपलेली असते .महत्त्व संपत जाते .नयनसुख में सुख,याने काही काळ आनंद मिळतो. पण वैचारिक आनंद ,मानसिक आनंद हा प्रगल्भतेवर अवलंबून असतो. त्यामुळे नयन सुखाची जादू होत असते.ती ओसरते. कधीकधी प्रगल्भतेचा बुरखा पांघरला असेल तर त्या वैचारिक आनंदना ची जादू ही ओसरते .अध्यात्म करतो करतो सांगणारे लोक ,काही काळाने एकदमच अध्यात्मांकडून परत आपल्या नेहमीच्या नैमित्तिका कडे वळतात. याचे कारण हेच आहे की ही जादू दीर्घायु नसते .जादू दीर्घकाळ टिकत नाही. कोई मिल गया म्हणून राकेश रोशन च्या चित्रपटात, जादू म्हणून एक कॅरेक्टर आहे.तो सूर्यप्रकाश घेऊन खुश होतो आणि त्याची जादूची किमया सुरू होते. तशी सूर्यप्रकाशाची किमया काही काळ राहते. पण नंतर ती संपून जाते. फॅशन फॅशनची पण जादूच असते .अगदी तरुणांपासून वृद्धापर्यंत सगळे त्या फॅशनने प्रेमाने भारून जातात .खाणे पोहे उपमा,सुजी सरते .पुढे खाण्यात पण बदल होत जातो आणि ते खाण्याचे फार कौतुक होतं. कॉर्न फ्लेक्स पिझ्झा पास्ता केक पेस्ट्री लसग्णा ,या गोष्टी फॅशन आली की काही काळ लोकांवर जादू टाकतात .काही काळ त्यांची साथ येते आणि नंतर जादुला ओहोटी लागते.रुचि बदलत जाते .जोपर्यंत जादू शिल्लक आहे तोपर्यंतच त्या जादूचा प्रभाव एन कॅश करून माणसं फायदा करून घेतात. तरी प्रेम आकर्षण जादु चिरंतन नसते,हे शेवटी सत्य आहे. मग कळतं हा चकवा होता. की काही काळ टिकलेला परिमाण होता.आपण जादू नी भारुन प्रभावित झालो. पण नंतर वाटतं की अरे हा अल्पजीवी बदल होता .काही काळच बरं वाटलं .आता आपण पूर्ववत पुन्हा झालो किंवा नवीन जादूच्या शोधात निघालो आहोत.देवदेव जादुगार असतो.दीर्घकाळ टिकणारी आणि आपली साथ कधीही न सोडणारी जादू ही फक्त परमेश्वराच्या अगाध शक्तीची असते. देव प्रेरणा आहे आणि परमेश्वराची जादू हीच खरी जादू होय.









दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831

Title code :- MAHMAR52107

# काजळेश्वर येथे आप्पा स्वामी मंदीरा जवळील शेतातील विद्युत खांब कोसळले जीवीत हाणी टळावी करीता विद्यूत विभागाने कार्यवाही करावी - मागणी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**योगेश उपाध्ये.**

**कारंजा लाड :** कारंजा तालुक्यातील काजळेश्वर परीसरात झालेल्या अतीवृष्टी मुळे व चक्रीवादळामुळे आप्पा स्वामी मंदीरा जवळील शेतकऱ्यांच्या शेतामधील विद्यूत खांब कोसळल्याने जाणाऱ्या येणाऱ्या लोकांच्या सुरक्षीततेला धोका निर्माण झाला आहे तर काजळेश्वर व पानगव्हान शेतशिवारात विद्यूत रोहीत्र कोसळल्याने अडथडा निर्माण झाला आहे. तेव्हा कारंजा विद्यूत उपविभागीय कार्यालयाने घटणेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्वरीत उपया योजना करावी अशी शेतकरी वर्गाकडून मागणी केली जात आहे .वृत्त असे की काजळेश्वर परीसरात नुकताच चक्रीवादळ सदृष्य तुफान पाऊस झाला. या पावसाने गावातील अनेकांच्या



घरावरील टिनपत्रे उडालीत मातीचे घरे असलेल्यांच्या बहूतांश भिंती कोसळल्यात तर शेतातील विद्युत खांब; रोहीत्र कोसळले. यात आप्पा स्वामी मंदीराजवळील काजळेश्वर शेत सर्वे नं ११९ गजाननराव भड यांच्या शेतातील विद्यूत खांब कोसळले. त्यामुळे जाणाऱ्या येणाऱ्यांच्या जीवीत्वास सुरक्षीततेच्या दृष्टिणे धोका निर्माण झाला. विद्युत लाईन कोसळल्याने परीसरातील नागरीकांना त्रास सहन करावा लागतो आहे. तेव्हा या घटनेची कारंजा महावितरण कार्याल याने त्वरीत दखल घ्यावी. पडलेले विद्युत खांब पुर्नरस्थापित करावीत किवा नवीन खांब बसऊन विद्यूत नियमीत करून घ्यावी अशी मागणी शेतकरी गजाननराव भड यांनी केली आहे . दुसरीकडे पान गव्हान शिवारातील प्रभाकर उपाध्ये यांचे शेतातील रोहीत्र व काजळेश्वर शिवा रातील अनील हेंडस्कार यांच्या शेतीतील रोहीत्र चक्रीवादळात कोसळले आहे. त्यांचे कारंजा महावितरणने रोहीत्र बसऊन द्यावे व विद्यूत नियमीत करुन द्यावी अशी लेखी स्वरुपात पत्र देऊन मागणी महावितरण कारंजा कार्यालयाला प्रभाकर उपाध्ये; अनील हेडस्कार या शेतक-यांनी केली आहे.

# विजेचा लपंडाव बंद करा, नसता परिणाम भोगा - डॉ.गोपाल बछिरे

**सेवाशक्ती टाईम्स.**
**कार्यालय प्रतिनिधी**



**मेहकर :** तालुका प्रतिनिधी विजेचा लपंडाव बंद करून प्रवाह सुरळीत करा नसता कार्यालयास ताळे ठोकू याचे परिणाम आपणास भोगावे लागेल असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने डॉ. गोपाल बछिरे, गजानन जाधव सर यांनी महावितरण कंपनीच्या अभियं त्यास देण्यात आला. लोणार शहर व ग्रामीण भागामध्ये एक महिन्यापासून विजेचा लपंडाव सुरू झाला आहे त्यामुळे सर्वसामान्यांचे पंखे, कुलर, टीव्ही, मिक्सर, विजेचे दिवे, तसेच विजेचे उपकरण जळून खाक होत आहेत. यास जबाबदार कोण? एक तर संपूर्ण महिन्याचा वीज आकार, वीज भार, इतर सर्व शुल्क ग्राहकांवर लादता, त्याचबरोबर महा वितरणच्या ढिसाळ कारभारा मुळे वीज ग्राहकांचे अतोनात नुकसान होत आहे, याला सर्वस्व महावितरण कंपनी व त्या कंपनीने आपल्या सारखे बेजबाबदार अभियंता नियुक्ती केली आपण स्वतः जबाबदार आहात आपणास ताकीद देण्यात येते विना विलंब त्वरित वीज प्रवाह सुरळीत करावा अन्यथा महावितरण कंपनीच्या पावर हाउस कार्यालयास ताळे ठोकण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी असा इशाराच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने महा वितरण कंपनीच्या अभियंताला देण्यात आला याप्रसंगी शिवसेनाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे, तालुकाप्रमुख ॲड. दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव, शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी, ज्येष्ठ शिव सैनिक सुदन अंभोरे, विभाग प्रमुख गोपाल मापारी, अल्प संख्यांचे अशपाक खान, विभाग प्रमुख ज़ानेश्वर दूधमोगरे, तानाजी अंभोरे, दिव्यांग सेलचे सिद्धार्थ अंभोरे, युवा सेना शहर प्रमुख श्रीकांत मादनकर ज़ानेश्वर जाधव वैभव जाधव तानाजी मापारी कैलास अंभोरे महिला आघाडीच्या जिल्हा उपप्रमुख संजीवनी वाघ, तालुका प्रमुख तारामती जायभाये यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# इंग्रजी शाळांच्या गर्दीत मराठी शाळा ओस!

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**




**घांटजी :** ग्रामीण भागातील पालक, मग तो शेतमजूर असो वा उच्चशिक्षित, प्रत्येकालाच आपल्या मुलांची शैक्षणिक प्रगती बघण्याची तीव्र इच्छा असते. आजकाल प्रत्येक पालकाला वाटते की त्यांच्या मुलांनी उच्च दर्जाचे शिक्षण घेऊन मोठी नोकरी मिळवावी आणि कुटुंबाचे नाव रोशन करावे. याच विचारसरणीतून आजचा पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या मागे धावत आहे. यामुळेच इंग्रजी शाळांचा वाढता प्रभाव मराठी शाळांना ओस पाडत आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांची उंच इमारत, महागडे गणवेश, महागडी पुस्तके आणि पाश्चात्त्य संस्कृतीचे अंधानु करण यांचा झगमगाट पाहून पालक स्वाभाविकपणे आकर्षित होतात. 'माझ्या मुलाने अस्खलित इंग्रजी बोलावे' या अपेक्षेतून आणि उज्ज्वल भविष्याचे स्वप्न उराशी बाळगून पालक स्वतःला कितीही त्रास झाला तरी आर्थिकदृष्ट्या न परवडणारी फी भरून मुलांना इंग्रजी शाळेत पाठवतात. शिक्षणाबद्दलची जागरूकता ग्रामीण भागात वाढत आहे, ही चांगली गोष्ट असली तरी, अलीकडे मुलांना इंग्रजी शाळेत घालणे एक फॅशन बनली आहे. त्यामुळे गरीब शेतमजूरसुद्धा आपल्या मुलांना शहरातील इंग्रजी माध्य माच्या शाळेत शिकवण्या साठी धडपडतो आणि याचा थेट परिणाम स्थानिक मराठी माध्यमाच्या शाळांवर होत आहे.आज इंग्रजी शाळांच्या लोंढ्यामुळे शहरातील तसेच ग्रामीण भागातील मराठी शाळा शेवटच्या घटका मोजत आहेत. गरीब मुलांनाही शिक्षण मिळावे आणि ते सुशिक्षित व्हावेत यासाठी महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागात अल्प दरात शिक्षणाची सोय करून दिली आहे. तरीही पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्यास अधिक प्राधान्य देत आहेत. इंग्रजी माध्यमातून प्राथमिक शिक्षण देणाऱ्या बहुतेक शाळा खाजगी शिक्षण संस्थांच्या आहेत. आज खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळा म्हणजे जणू पैसे कमवण्याचा धंदा बनला आहे. स्नेहसंमेलन, विविध शिबिरे, सहली आयोजित करून शैक्षणिक खर्चाच्या नावा खाली पालकांवर मोठा आर्थिक भार टाकला जातो आणि पालकही आपल्या मुलांच्या भविष्यातील सुखी जीवनाचा विचार करून तो निमूटपणे सहन करतात. मराठी शाळा म्हणजे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात, असा गैरसमज पालकांमध्ये निर्माण झाला आहे. त्यामुळे विद्यार्थी नसल्याने अनेक मराठी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. हे स्पर्धेचे युग असल्याने मराठी शाळांच्या या परिस्थितीला अपुऱ्या सोयी सुविधा, शिक्षकांची उदा सीनता आणि शिक्षणाचा खाला वलेला दर्जा अशा अनेक गोष्टी जबाबदार असल्याचे काही जाणकार पालक सांगतात. ग्रामीण भागातील अनेक शाळांची ओळख आज केवळ पोषण आहारापुरतीच मर्यादित झाली आहे. मात्र, शासनाने मराठी शाळांसाठी चांगल्या सोयी सुविधा व ठोस उपाययोजना करून त्यांची ही दुरावस्था सुधारणे गरजेचे आहे, असेही काही पालकांचे मत आहे.

# गावातील प्रत्येक कन्येसाठी ‘कन्यादान योजना’

## विठ्ठल रामदास कल्याणकर व सौ.शारदाताईंचा स्तुत्य उपक्रम

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शेख कदीर भाई.**



**संग्रामपूर :** तालुक्यातील टूनकी बू खुर्द या गावात मागील १ मे महाराष्ट्र दिनाच्या शुभप्रसंगी टूनकी बू खुर्द गावात एक स्तुत्य उपक्रम स्व खर्चातून सुरु करण्यात आला आहे. गावातील प्रत्येक मुलीच्या लग्नासाठी कन्यादान म्हणून २१०० रुपये देण्याची योजना आजपासून राबवण्यात येत आहे.ही योजना श्री. विठ्ठल रामदास कल्याणकर आणि सौ. शारदाताई वि. कल्याणकर यांच्या स्वखर्चातून सुरु करण्यात आली असून, त्यामागील उद्देश म्हणजे समाजातील इतरांना प्रेरणा मिळावी आणि विवाह प्रसंगी थोडा का होईना, आर्थिक हातभार लागावा.गावातील कोणाच्याही घरी लग्न असल्यास, संबंधितांनी ही माहिती अगोदर कल्याणकर कुटुंबीयांना कळवावी, जेणेकरून कन्यादान रक्कम वेळेवर पोहोचवता येईल. तसेच आतापर्यंत पाच ते सात लग्न मंडपात जाऊन लग्न सोहळा प्रसंगी 2100 रुपये प्रमाणे भेट देण्यात आली या उपक्रमाचे गावात सर्वत्र कौतुक होत असून, सामाजिक सलोखा आणि एकोप्याचे हे उत्तम उदाहरण ठरत आहे.

# अबब...! बाईकच्या सीटखाली उंदरांची पिल्ले निसर्गाचा चमत्कार आणि मातृत्वाचे अनोखे दर्शन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**




**चिखली :** चिखली येथील युवा पत्रकार छोटू कांबळे यांची बाईक म्हणजे मोटारसायकल वाहन त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. दैनंदिन वार्तांकन व सामाजिक कार्यासाठी दररोज १० ते ३० किमी प्रवास करणारी ही बाईक फक्त वाहतुकीचे साधन नाही, तर अनेक आठवणींचा साथी दारही आहे. मात्र, अलीकडेच त्यांना त्यांच्या बाईकच्या सीटखाली असा अनुभव आला, ज्याने निसर्गाची अद्भुतता आणि मातृत्वाचे सौंदर्य उलगडले. पावसाळ्याच्या दिवसांत सीट कव्हर दुरुस्ती करण्या साठी कांबळे यांनी सुधीर कुशन वर्क येथे भेट दिली. सीट कव्हर उघडताच ते आश्चर्यचकित झाले–तिथे उंदराच्या आठ ते नऊ छोट्या पिल्लांची सुरक्षित जागा होती. त्या पिल्लांच्या आईने एका हलणाऱ्या, सतत प्रवास करणाऱ्या बाईकच्या सीटखाली तिच्या पिल्लांसाठी मऊ, उबदार आणि सुरक्षित घर तयार केले होते.मायाळू आई आणि तिचा विलक्षण निर्णय एका उंदराच्या आईने तिच्या पिल्लांसाठी अशी जागा निवडणे हे केवळ निसर्गाचा चमत्कारच नव्हे, तर मातृत्वाच्या अपार मायेचे प्रतीक आहे. कांबळे यांना आश्चर्य वाटले की, सध्या लगीन घाई असून पाहुणे व मित्रमंडळीच्या लग्नासाठी दररोज दिवसातून ५०-६० किमी प्रवास करणाऱ्या बाईकच्या सीटखाली ही पिल्ले इतक्या सुरक्षितपणे राहिली कशी !प्रेमळ हस्ते पिल्लांची सुटकाकांबळे यांनी या पिल्लांची काळजीपूर्वक पाहणी केली आणि त्यांना त्यांच्या आईच्या निवाऱ्या नजीक सुखरूप आणि सुरक्षित पोहोचवले. त्यांच्या या संवेदन शीलतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. या घटनेने त्यांनी मातृत्व, निसर्गाची अचूक योजना, आणि जीवसृष्टीतील अनोखे गुण अधोरेखित केले आहेत. समाजासाठी संदेश - या प्रसंगातून निसर्गाच्या आणि प्राणिमात्रांच्या जीवनातील किमयांचे दर्शन घडते. मानवी हस्तक्षेप कमी करून निसर्गाला त्याचे कार्य करू देणे, हे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. अशा छोट्या गोष्टींमधून आपण निसर्गाकडून किती काही शिकू शकतो, हेच या अनुभवाने दाखवून दिले आहे.

# मान्सूनपूर्व तयारीचा वाशिम पॅटर्न: पुरस्थिती हाताळण्यासाठी यंत्रणा सज्ज

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

**रिसोड :** जिल्हा प्रशासनाने येत्या मान्सून हंगामासाठी संपूर्ण तयारी केली असून संभाव्य पुरस्थिती हाताळण्या साठी विविध उपाययोजना आणि यंत्रणा राबवण्यात आल्या आहेत.दि. ६ मे २०२५ रोजी जिल्हास्तरीय मान्सून आढावा बैठक घेण्यात आली. यामध्ये सर्व संबंधित विभागांना आवश्यक सूचना व आवश्यक ते निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हा व तालुकास्तरावर २४x ७ नियंत्रण कक्ष सुरु करण्यात आले आहेत. राज्य आपत्कालीन राखीव दल नागपूर पथकाच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण व मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ८३ गावांना पूराचा संभाव्य धोका असून त्या पार्श्व भूमीवर नागरिकांना स्थलांतरित करण्यासाठीच्या सुविधा, आपत्ती साहित्याची तपासणी आणि सज्जता पूर्ण करण्यात आली आहे. पुरामुळे बाधित होणाऱ्या भागांमध्ये ३०० आपत्ती मित्र, ४८ ॲम्ब्युलन्स, ३ बोट, ७ अग्निशमन वाहनांसह इतर यंत्रणा कार्यरत आहेत. सुरक्षिततेसाठी जीवनरक्षक साहित्य – १३३ लाईफ जॅकेट्स, १११ लाईफ रिंग्स, १८ सर्च लाईट्स, १८०० मीटर बचाव दोरी, ३ पोर्टेबल लाईट्स आदी साहित्य उपल करून देण्यात आले आहे. जिल्हा व तालुका स्तरावरील शोध व बचाव पथके सज्ज असून १०५ पोहणारे पोलीस कर्मचारी आपत्कालीन सेवा देण्यासाठी तत्पर आहेत.



पुरस्थितीत नागरिकांनी घ्याव याची काळजी, अफवां पासून दूर राहणे, महत्त्वाचे कागदपत्रे सुरक्षित ठेवणे, शुद्ध पाण्याचा वापर करणे अशा सूचना जनजागृतीद्वारे देण्यात येत आहेत.पुराच्या पार्श्व भूमीवर ४६ संरक्षक कामांना शासन मान्यता प्राप्त झाली असून ही कामे प्रगतीपथावर आहेत. एसओपी तयार करण्यात आले असून जनजागृतीसाठी पोस्टर व माहितीपत्रके वितरण करण्यात आले आहे. “मान्सूनपूर्व तयारीचा भाग म्हणून जिल्ह्या तील सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. प्रत्येक नागरिकाचे संरक्षण हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. संभाव्य आपत्तीला सामोरे जाण्यासाठी प्रशा सनाने आवश्यक नियोजन आणि संसाधनांची सुनिश्चितता केली आहे. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, आपत्तीच्या वेळी शांतता राखावी, अधिकृत सूचनांचे पालन करावे आणि स्थानिक प्रशासनाशी सहकार्य करावे. “जिल्ह्यात संभाव्य पुरपरि स्थितीचा विचार करून संपूर्ण यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. आपत्तीच्या प्रसंगी जलद प्रतिसाद आणि योग्य समन्वयासाठी आमचा प्रयत्न सातत्याने सुरु आहे.” – जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहु भगत

# “अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले – मूग, उडीद, भुईमुगाच्या शेतात पाणीच पाणी!"
## गौंडाळा (ता. मेहकर) परिसरात मुसळधार पावसाने उन्हाळी पिकांची वाट लावली;
## आमदार सिद्धार्थ खरात यांनी केला शेतातील थेट दौरा – तातडीच्या पंचनाम्यांचे प्रशासनाला आदेश!

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**



मेहकर : मेहकर तालुक्यातील गौंडाळा गावात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या आशा, मेहनत आणि गुंतवणुकीवर अक्षरशः पाणी फेरलं. गेल्या काही दिवसांपासून उन्हाळी हंगामासाठी जोमाने उभारी घेतलेल्या मुग, उडीद, भुईमुग आणि इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पिकांच्या मुळाशीच पाणी साचल्याने अनेक शेतकरी उध्वस्त झाले आहेत.या गंभीर परिस्थितीत आमदार सिद्धार्थ खरात यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी महसूल प्रशासनाला "तातडीने पंचनामे करा, आणि शेतकऱ्यांना त्वरेने मदत द्या" अशा शब्दांत खडसावले.”पिकांवर पाणी, डोक्यावर कर्ज – आता कोण वाचवणार?" शेतकऱ्यांचा आक्रोश "बियाणं, खत, मजूरी, औषधं – सर्वकाही उधारीवर घेतलं, आता सगळं पाणीपाण झालं!" अशा असंख्य प्रश्न त्यांना सतावत शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू आणि मनात भीती आहे. अनेकांनी शेतीसाठी घेतलेली कर्ज आता फेडायची कशी, असा आहे.अवकाळी पावसाने निर्माण केलेली ही नैसर्गिक आपत्ती आता प्रशासनाची परीक्षाही ठरणार आहे. आमदार खरात यांचे तातडीचे आदेश आल्याने प्रशासन खडबडून जागे झाले असून , शेतकऱ्यांना मदत शेतकऱ्यांच्या नुकसानीची मदत आणि न्याय मिळावा अशी अपेक्षा शेतकरी वर्ग करत आहेत.

### - पाहणी दौऱ्यात प्रशासनासोबत आमदारांचा 'सवाल-जवाब'-

**या पाहणी दौऱ्यात आमदार खरात यांच्यासोबत ऍड. आकाश घोडे (युवासेना तालुका प्रमुख), सरपंच गजानन जाधव,डॉ सार्थ सिद्धार्थ खरात, मेहकर शहर अध्यक्ष किशोरभाऊ गारोळे,मंडळ अधिकारी, तलाठी, आणि गावातील शेकडो शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांनी आपली व्यथा स्पष्ट शब्दांत मांडली, तर आमदारांनीही प्रशासनाकडे तत्काळ कारवाईसाठी ठोस सूचना दिल्या.**

### - "हा केवळ नैसर्गिक नाही, तर प्रशासनिक कसोटीचाही काळ!" – सिद्धार्थ खरात -

**"शेतकऱ्यांचं दुःख समजून घेणं ही फक्त सहानुभूती नव्हे, ती माझी जबाबदारी आहे," असे आमदार खरात यांनी ठामपणे सांगितले. "पंचनामे कागदावर नको, जमिनीवर हवे!"**

# कुणबी प्रमाणपत्र शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद
## पाथरी तालुक्यातील 23 गावांतील लाभार्थ्यांचा सहभाग

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहेमद अन्सारी.**



पाथरी : तालुक्यात सापडलेल्या कुणबी नोंदी नुसार २३ गावांतील पात्र लाभार्थ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी सकल मराठा सेवकांच्या वतीने गुरुवार २२ मे रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकल मराठा सेव कांच्या वतीने आयोजीत शिबिर शहरातील तीन सीएससी केंद्रांवर घेण्यात आले आहे. शिबीर उद्धाटनाचा कार्यक्रम ओमकार नगर येथील अक्षय कॉम्प्युटर येथे सकाळी ११ वाजता संपन्न झाला. शिबीराचे उद्धाटन उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून मराठा सेवक बापूराव कोल्हे, भागवत कोल्हे, यांच्यासह अमोल भाले पाटील, राजेश ढगे, माऊली महात्मे ,नितिन कापसे, राजेंद्र मांगुळकर, तुकाराम पौळ आदींची उपस्थिती होती. आयोज कांनी दिलेल्या माहिती नुसार हे शिबिर सलग तीन दिवस चालणार असून, पहिल्याच दिवशी २९ लाभार्थ्यांनी कुणबी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी ऑन लाईन अर्ज दाखल केले. हे शिबिर शनिवार २४ मे पर्यंत सुरु राहणार आहे. दरम्यान, कुणबी नोंद असलेल्या गावांतील लाभा र्थ्यांनी आवश्यक कागद पत्रांसह अर्ज सादर करावेत, असे आवाहन सकल मराठा सेवकांच्या वतीने करण्यात आले आहे.

**पाथरी तालुक्यातील विविध गावांमध्ये एकूण ७१४ कुणबी नोंदी सापडल्या असून, आतापर्यंत २ हजार २८७ कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप प्रशासनाने केले आहे. पाथरी उपविभागातील तीन तालुक्यांमध्ये एकत्रितपणे ४ हजार ४८९ कुणबी जात प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली असल्याची माहिती उद्‌घाटन कार्यक्रमात बोलतांना उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी दिली आहे.**

# भेंडवळ शिवारात अवैध देशी दारूचा साठा उध्वस्त 9,660 रुपयांचा मुद्देमाल जप्त
## ठाणेदार श्रीकांत निचळ यांच्या मार्गदर्शनात कार्यवाही!

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शेख कदीर भाई.**



जळगाव जामोद : तालुक्यातील भेंडवळ बु. शिवारामध्ये पोलिसांनी केलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणात अवैध देशी दारु व मोह सडवा साठा उघडकीस आला आहे. या कारवाईत तब्बल ९,६६०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपीस तात्पुरत्या अटींवर सोडण्यात आले आहे.सविस्तर माहिती अशी की, पोलीस स्टेशन जळगाव जामोद येथे कायमी अप क्रमांक २५८/२०२४ नुसार, कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी नापोका शेख इरफान (ब. क्र. ५०४) यांच्या तक्रारी वरुन, रामेश्वर राजाराम जाधव (वय ४९, रा. भेंडवळ बी.टी.) याच्या शेतामध्ये विक्रीसाठी साठवलेली अवैध देशी दारु आणि मोह सडवा जप्त करण्यात आले.घटनेची वेळ: २१ मे २०२५ रोजी संध्याकाळी ६:३० वाजता पोलिस कारवा ईची वेळ: त्याच दिवशी रात्री ८:०२ वाजताजप्त मुद्देमालात समाविष्ट तीन लोखंडी टोप्यांत साठवलेले ४५ लिटर मोह सडवा (किंमत: ₹2,250)दोन १५ लिटरचे कॅन एकूण ३० लिटर देशी दारु (किंमत: ₹3,000)आठ ५ लिटरचे प्लास्टीक कॅन एकूण ४० लिटर दारु (किंमत: ₹4,000)विविध कंटेनर व भांडी (किंमत: ₹410) एकूण मुद्देमालाची किंमत: ₹9,660 पोलिसांनी पंचा समक्ष छापा टाकून, नमूद मुद्देमाल जप्त केला. नमुन्यासाठी १८० एमएल मोह सडवा व १८० एमएल देशी दारु वेगळी ठेवण्यात आली असून उर्वरित दारु घटना स्थळीच नाश करण्यात आली. दाखल अधिकारी: मपोहेका अर्चना पाच पोरतपास अधिकारी: नापोका शेख इरफानसदर गुन्ह्यात आरोपीस पुढील सुनावणी साठी न्याया लयात हजर राहण्याच्या अटीवर लेखी सुचनापत्र देऊन मुक्त करण्यात आले असून, पुढील तपास पोलीस निरीक्षकांच्या आदेशानुसार सुरु आहे.जळगाव जामोद पोलीस ठाण्याची ही धडक कारवाई गावात चर्चेचा विषय ठरली आहे.

# गावातील प्रत्येक कन्येसाठी ‘कन्यादान योजना’
## विठ्ठल रामदास कल्याणकर व सौ.शारदाताईंचा स्तुत्य उपक्रम

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शेख कदीर भाई.**



संग्रामपूर : तालुक्यातील टूनकी बू खुर्द या गावात मागील १ मे महाराष्ट्र दिनाच्या शुभप्रसंगी टूनकी बू खुर्द गावात एक स्तुत्य उपक्रम स्व खर्चातून सुरु करण्यात आला आहे. गावातील प्रत्येक मुलीच्या लग्नासाठी कन्यादान म्हणून २१०० रुपये देण्याची योजना आजपासून राबवण्यात येत आहे.ही योजना श्री. विठ्ठल रामदास कल्याणकर आणि सौ. शारदाताई वि. कल्याणकर यांच्या स्वखर्चातून सुरु करण्यात आली असून, त्यामागील उद्देश म्हणजे समाजातील इतरांना प्रेरणा मिळावी आणि विवाह प्रसंगी थोडा का होईना, आर्थिक हातभार लागावा.गावातील कोणाच्याही घरी लग्न असल्यास, संबंधितांनी ही माहिती अगोदर कल्याणकर कुटुंबीयांना कळवावी, जेणेकरुन कन्यादान रक्कम वेळेवर पोहोचवता येईल. तसेच आतापर्यंत पाच ते सात लग्न मंडपात जाऊन लग्न सोहळा प्रसंगी 2100 रुपये प्रमाणे भेट देण्यात आली या उपक्रमाचे गावात सर्वत्र कौतुक होत असून, सामाजिक सलोखा आणि एकोप्याचे हे उत्तम उदाहरण ठरत आहे.

# सदगुरु अर्बन च्या नवीन संचालकांची निवड व सत्कार

**सेवाशक्ती टाईम्स.**
**प्रकाश सुखधाने.**



मेहकर : सदगुरु अर्बन च्या संचालक पदी शिवसिंग रामेश्वर साळोख. प्रवीण नामदेव वाकोडे व भगवान श्री राम पवार तज्ञ संचालक यांची सदगुरु अर्बन बँकेचे अध्यक्ष श्री संतोष विश्वनाथ म्हस्के यांनी अत्यंत पारदर्शक पद्धतीने बँकेचा व्यवहार चालत असलेली सदगुरु अर्बन च्या संचालक पदी अध्यक्ष संतोष विश्वनाथ मस्के यांच्या मार्फत निवड करण्यात आली त्याप्रसंगी काशिनाथ तुकाराम बाहेकर सौ कोकिळा बाई गोविंद शेळके संचालक व इतर सर्व संचालक मंडळ तसेच बँकेतील सर्व कर्मचारी वृंद कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते.

# झोडगा येथील ग्रामपंचायतीना बायोमॅट्रिक प्रणाली बसविण्यात यावी
## - कुलदिप चव्हाण,गोर सेना जिल्हाअध्यक्ष अकोला

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भारत चव्हाण.**

सारकिन्ही : बार्शीटाकळी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या झोडगा गावात ग्रामसेवकांना मुख्यालयाची ऍलर्जी अपडाऊनमुळे गावांच्या विकासाला ब्रेक होत आहे शासकीय कर्मचाऱ्यांना वेळेचे बंधन लागून प्रशासकीय कार्यालयात बायोमॅट्रिक प्रणाली सुरु करण्यात यावी अशी मागणी कुलदीप चव्हाण गोर सेना जिल्हा अध्यक्ष अकोला यांनी निवेदन द्वारे बिडीओ साहेबना केली आहे मात्र बार्शीटाकळी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या झोडगा गावाचा विकासाची धुरा असलेल्या ग्रामपंचायत कार्यालयात अद्यापही बायोमॅट्रिक प्रणाली सुरु झाली नसल्याने ग्रामसेवक कर्मचाऱ्यांची मनमानी सुरुच आहे ग्रामसेवकाच्या अपडाऊनमुळे झोडगा गावांच्या विकासाला ब्रेक लागल्याने शासनाने ग्रामपंचायत मध्ये बायोमॅट्रिक प्रणाली सुरु करावी अशी मागणी झोडगा येथील ग्रामस्थांकडून जोर धरु लागली आहे प्रत्येक गावातील ग्राम पंचायत अशी निगडित कामासाठी ग्रामसेवकांची सतत वाट बघत बसण्याची वेळ अनेक दिवसापासून झोडगा येथील नागरिकांवर येत आहे कारण ग्रामसेवक हे बाहेर गावाहून अपडाऊन करतात त्यामुळे अनेकदा नागरिकांना विविध कागदपत्रांसाठी ग्रामपंचायत कार्यालय बाहेर ताटकळत बसावे लागते यासाठी प्रत्येक




ग्रामपंचायत मध्ये बायोमॅट्रिक प्रणाली कार्यान्वित करुन ग्रामविकासाला योग्य चालना द्यावी अशी मागणी कुलदीप चव्हाण गोर सेना जिल्हा अध्यक्ष अकोला व ग्रामस्थांकडून व्यक्त केली आहे जिल्ह्यातील ग्रामपंचायत मध्ये शासनाच्या माध्यमातून ग्रामविकासाला चालना देणाऱ्या शेकडो योजना राबविल्या जातात परंतु प्रत्येक योजनेचा लाभ घेण्यासाठी अनेक प्रकारचे दाखले आठ अ ,तसेच जन्म मृत्युपत्र लागतात अनेकदा ग्राम सेवक हे पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे दिसतात त्यामुळे अनेकदा नागरिक हक्काच्या योजनेपासून वंचित राहावे लागते शासनाद्वारे जाहीर झालेल्या योजना साठी विशिष्ट मुदतीत कागदपत्रांची पूर्तता करणे बंधन कारक असते सदर योजनेच्या लाभासाठी लागणारी कागदपत्रे शासनाचा दुवा असलेले ग्राम सेवक हे अधिकारी यांच्याकडून घ्यावे लागतात परंतु सदर कर्मचारी मुख्यालय राहण्याचा शासनाचा आदेश धाब्यावर बसवीत ग्राम पंचायतचे ग्रामसेवक, हे अधिकारी मुख्यालय राहत नाही त्यामुळे नागरिकांना परेशानी होते परंतु शासनाने ग्रामपंचायत मध्ये बायोमॅट्रिक प्रणाली बसविल्यास सदर कर्मचारी मुख्यालय राहतील आणि ग्रामपंचायत भवन उघडे ठेवण्याची वेळ सुद्धा वाढेल यासाठी लोकप्रतिनिधी नि शासनाकडे बायोमॅट्रिक प्रणाली साठी पाठपुरावा करीत नागरिकांचा त्रास वाचून ग्राम विकासाला चालना देण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी झोडगा येथील नागरिक द्वारे होत आहे तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्रामसेवक यांना मुख्यालय राहण्याचे आदेश देण्यात यावी अशी मागणी झोडगा येथील कुलदीप चव्हाण गोर सेना जिल्हा अध्यक्ष अकोला यांनी निवेदन द्वारे बिडीओ साहेबना मागणी केली आहे तसेच झोडगा येथील ग्रामस्थांकडून होत आहे